# ज्ञात-अज्ञात - भाग २

माझा बाड-बिस्तरा गुंडाळून मी निनादच्या स्टुडिओ अपार्टमेंटमध्ये शिफ्ट झाले. माझ्या जागी दुसरी एक रूम पार्टनर विनी आणि सती बरोबर रहायला आली. जागाबदल ह्यापेक्षा वेगळं काहीच नव्हतं. माझा अभ्यास, निनादने मला रोज कॉलेजला ड्रॉप करायचं. निनाद अगदी टिपिकल अमेरिकन नवऱ्यासारखं करत असे. मला अभ्यास करायला वेळ मिळत होता. भविष्याच्या दृष्टीने आम्ही पैशाचं प्लॅनिंग आणि सेव्हिंग करायचं ठरवलं. असा एक आठवडा अगदी मस्त गेला. रविवारी आम्ही बाहेर भेटायचो, हिंडायचो ते त्या दिवशी गेलो नाही. दोघांनी मिळून घरीच जेवण केलं आणि थोडं सुस्तावलेल्या, आळसावलेल्या क्षणी दोघंही आपआपल्या मनावरचा संयम हरवून बसलो. प्रेमाला भाषा नव्हती. ती साद होती. दोघं कधी एकरूप झालो कळलं नव्हतं. दोघांनाही खूप अपराधी वाटत होतं पण आपण वागलो ते चूक असं वाटत नव्हतं.

इंडियाला आई-बाबांना फोन, कधी सवड काढून पत्र पाठवणं असं सगळं रूटीन चालू होतं. फक्त महिन्याभरापूर्वी मी दुसऱ्या ठिकाणी - निनादच्या रूमवर शिफ्ट झालेय हे त्यांना कळवायचं मी कटाक्षाने टाळलं होतं.

मुंबईला एअरपोर्टवरून विमानाने टेक ऑफ केल्यानंतर आता तासाभरात विमानातलं पहिलं डिनर आलं. थोडसं खाऊन गोळ्या घेतल्या आणि वर छान कडवट कॉफी प्यायले. खरं तर मला अशी कडवट कॉफी मुळीच आवडत नाही. मला फक्त दुधाची, जास्त साखर घातलेली आणि स्ट्रॉंग कॉफी आवडते. निनाद ती खूप छान करतो...

पुन्हा निनाद... माझा जीवनपट माझ्या डोळ्यांपुढे पुन्हा उलगडत होता. खरं तर गेली बत्तीस वर्ष मी माझ्याच मनाच्या लॉकरमध्ये तो पूर्ण बंदिस्त करून ठेवला होता. त्या लॉकरची किल्ली फक्त माझ्याकडेच होती. त्यामुळे इतर कुणीही तो कप्पा तो लॉकर आजपर्यंत उघडू शकलं नव्हतं. मीही उघडला नव्हता. कारण नियतीने त्या लॉकरची किल्ली दूर कुठेतरी भिरकावून द्यायला मला भाग पाडलं होतं. पण आज मात्र तो सगळा भूतकाळ एखाद्या सिनेमासारखा माझ्या डोळ्यांसमोर उलगडत होता. आजच असं का बरं होत होतं? नियती मला काही संकेत देत होती का?

डिनर होऊन हळूहळू विमानातले दिवे बंद होऊन बहुतेक सर्वजण झोपेच्या अधीन होऊ लागले होते. पण माझी झोप मात्र आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलत होती.

निनाद आणि मी त्या दिवशी एकत्र आलो, एकरुप झालो. आणि काहीच न घडल्यासारखं वागायचं ठरवून पुन्हा आमच्या डे टू डे रूटीनमध्ये गुंतलो. पण नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. तिने आपला डाव साधला होता. जवळजवळ दीड-दोन महिन्यानंतर आम्हा दोघांना त्या गोष्टीची कल्पना आली. आज बोलू, उद्या बोलू करताना आणखी दोन आठवडे उलटले. मग डॉक्टर - सोनेग्राफी सर्व काही. सोनोग्राफीत स्क्रीनवर दिसलेला दहा आठवड्याचा तो इवला जीव! दोघेही मोहरलो. पण आता मात्र काहीतरी ठोस निर्णय घेणं भाग होतं.

निनादचे दोन जिवलग मित्र आणि माझ्या मैत्रिणी - विनी, सती यांच्या साक्षीने आम्ही कोर्ट मॅरेज केलं. निनाद आता माझी खूप काळजी घेत होता. माझी परीक्षा जवळ आली होती. परीक्षेनंतर तीन महिन्यांनी माझी डिलिव्हरी डेट येत होती. कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सिलेक्शन होऊन मला चांगल्या कंपनीत लगेच जॉईन होण्याची ऑफरही हातात होती. नोकरीचं कारण पुढे करून इंडियाला जाणं लांबवायचं आणि बेबी तीन-चार महिन्यांचं झाल्यावर रजा घेऊन तिघांनी तिकडे जायचं. दोघांच्याही घरी सगळं खरं खरं सांगायचं आणि त्यावेळच्या सिच्युएशनप्रमाणे वागायचं एवढाच आमच्यापुढे पर्याय होता.

आमच्या सुदैवाने आमच्या शेजारी रहाणारं गुजराती दांपत्य त्यावेळी आमच्या पाठी उभं राहिलं. शेवटच्या नवव्या महिन्यात तर त्या आन्टी रोज रात्री माझ्या सोबत, मला रात्री-अपरात्री कधीही जरूर पडली तर, ह्या विचाराने आमच्याकडे झोपायला येत होत्या.

माझी परीक्षा झाली, जॉब सुरू झाला. त्याबरोबरच आमचं दोघाचं बेबीला कसं वाढवायचं त्याची सेशन्स डॉक्टरकडे सुरू झाली. शेजारच्या पटेल आन्टी मुळे माझं खाणं पिणं बाळाचं वजन सर्व काही ठीक होतं.

मला इकडे मल्टीनॅशनल कंपनीमध्ये जॉब लागल्याने तिकडे इंडियाला आई-बाबा, दादा, आशू सर्व खूष होते. दादा एव्हाना एम.डी. करून प्रॅक्टीस करत होता. त्याला मुली सांगून येत होत्या. पण माझं लग्न झाल्यावरच लग्न करायचं त्याने ठरवलं होतं. तोपर्यंत प्रॅक्टिसमध्ये जम बसवतो असं त्याने बाबांना पटवून दिलं होतं.

यथावकाश मी एका गोंडस मुलाला जन्म दिला. त्याचं नाव आम्ही रोहन ठेवलं. रोहन आमच्या दोघांच्या, माझ्या निनादच्या प्रेमाचं पहिलं प्रतिक. तो खूपच गोड अगदी निनादसारखाच

होता दिसायला. शेजारचे पटेल आन्टी-अंकल आमचे मानलेले आईबाबा आणि रोहनचे ग्रॅन्ड पॅरेंटस् बनले होते. माझी नोकरी नवीन असल्यामुळे मला महिन्यापेक्षा जास्त मॅटर्निटी लीव्ह मिळू शकली नाही. पण ऑफिसचेच क्रेश - बेबी सिटिंगची सोय असल्यामुळे फारसे कठीण वाटले नाही. निनाद आम्हा दोघांना ड्रॉप आणि पिकअप् करत होता. त्याची खरं तर जास्त धावपळ होत होती त्यामुळे. पण तरीही आम्ही दोघंही खूप खूष होतो. अजून दोन-तीन महिन्यांनी दोन किंवा मिळाल्यास तीन आठवड्यांची रजा घेऊन आम्ही रोहनला घेऊन इंडियाला जाऊन यायचं ठरवत होतो. मला आणि निनादलाही घरच्यांना भेटायचे वेध लागले होते. आम्ही इंडियाला जायच्या दृष्टीने रजेचं प्लॅनिंग करत होतो. दिवस खूप सुंदर, इंद्रधनुसारखे सप्तरंगी झाले होतो. पण आयुष्य इतकं सरळधोप थोडंच असतं? सगळ्या गोष्टी आपल्या मनाप्रमाणे थोड्याच घडतात.

त्या दिवशी ऑफिसला गेल्या गेल्या सकाळीच दादाचा फोन आला. ``बाबा सिरियस आहेत. तुझीच सारखी आठवण काढताहेत. काहीही कर. कसंही जमव. पण एकदा त्यांना भेटायला येऊन जा. कदाचित..." दादाला पुढे बोलवेना. माझ्या हातापायातलं अवसान गळालं. ``दादा बोल, कदाचित काय, बोल ना!" पलिकडून दादा सांगत होता - ``बाबांना सिव्हियर अ‍ॅटॅक आलाय. ते कोमात गेलेत. फक्त तुझं नाव घेतात मधूनच. बाकी काहीच कळत नाहीये त्यांना. आमचे सगळे प्रयत्न चालू आहेत पण कशाचाच उपयोग नाही. कदाचित फक्त तुझ्यात, तुला भेटण्यासाठी जीव गुंतलाय असं वाटतं." फोन माझ्या हातातून गळून पडला. मी धप्पकन खुर्चीवर बसले. माझ्या एका कलिगने फोनवर बोलून सर्व विचारून घेतलं. निनादला फोन करून माझ्या ऑफिसमध्ये बोलावलं. मॅनेजरशी डिस्कशन होऊन मला सात दिवसांची रजा सॅक्शन झाली. छोट्या रोहनला निनाद आणि आन्टीजवळ सोपवून मी तात्काळमध्ये तिकीट काढून इंडियाला निघाले. रोहनला सोडून निघवत नव्हतं. पण बरोबर नेणंही शक्य नव्हतं.

मी मुंबई एअरपोर्टला उतरले आणि तिथून प्रायव्हेट टॅक्सी करून पुण्याला बाबांकडे निघाले. मला फक्त बाबा दिसत होते. अडीच-तीन वर्षापूर्वी मला इथेच एअरपोर्टवर सोडायला आलेले, माझी काळजी करणारे आणि मला सूचना देता देता हमसून हमसून रडणारे. ही मधली वर्षं कुठे उडून गेली होती. रोहन, निनाद, पटेल अंकल-आन्टी कुण्णी कुण्णी नाही. मला फक्त माझ्या बाबांना भेटायचं होतं. त्यांना पहायचं होतं. त्यांचा हात पाठीवर फिरायला हवा होता.

टॅक्सी मुंबई-पुणे हायवेला लागली. टॅक्सी ड्रायव्हरने विचारलं होतं, ``नाश्ता-चाय लेनेके लिए रुकना है क्या बहेनजी?" मी त्याला नाही म्हटलं. उलट तो फारच स्लो टॅक्सी चालवतोय असं वाटून

त्याला म्हटलं, ``आप बहुतही धीरे चला रहे हो, थोडा फास्ट चलाईये. हमे जल्दी पूना पहुँचना है.'' तो म्हणाला, ``बहेनजी रास्ता खराब है. हम बराबर चला रहे है.'' माझ्या मनाची नुसती घालमेल.

आणि तेवढ्यात काही कळायच्या आत आमच्या टॅक्सीला समोरून येणाऱ्या ट्रकची जोरदार धडक! टॅक्सी ड्रायव्हर पूर्ण रक्ताच्या थारोळ्यात आणि मी - माझ्या डोक्याला जबरदस्त मार लागून भळभळा रक्त वहात होते आणि हळूहळू माझी शुद्ध हरपत गेली...

आत्तासुद्धा त्या आठवणीने मी प्रचंड घाबरले. विमानात एव्हाना सगळ्यांचीच निजानीज झाली होती. मी उठून अस्वस्थपणे दोन फेऱ्या मारल्या. केबिन क्रूने मला काही हवंय का म्हणून विचारले. मला त्या क्षणी फक्त कुणाच्या तरी आधाराची, कुणाशी तरी बोलण्याची गरज होती. पण त्याला काय सांगणार? सात-आठ तास प्रवास अजून बाकी होता. झोपेचा तर पत्ताच नव्हता. आठवणींचा भुंगा घोंगावत होता. मी परत सीटवर येऊन बसले. एअर होस्टेसने मला गरम कॉफी आणून दिली. कॉफीचे घोट घेता घेता मी पुन्हा भूतकाळात हरवले. जणू मागचा अर्धा राहिलेला पिक्चर पुन्हा पुढे पहावा तशी.

(क्रमश:)

**लीना माटे**